# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 23.10.2025** **वार-गुरुवार**

---

**गर्भाशय**

पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील 9 ते 14 वयोगटातील मुलींना गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगावरील प्रतिबंधासाठी एचपीव्ही लस दिली जाणार आहे. यासंदर्भात ‘जीविका फाउंडेशन’सोबत करार करण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी दिली. या कराराच्या माध्यमातून 9 ते 14 वर्षे वयोगटातील सर्व मुलींना गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगावरील प्रतिबंधासाठी एचपीव्ही लस विनामूल्य दिली जाणार आहे. दिवाळीनंतर या उपक्रमाला सुरुवात होणार आहे. ही कर्करोग प्रतिबंधक लस घेणं ऐच्छिक असून, त्यापूर्वी पालकांची संमती घेण्यात येणार आहे.

**आयुर्वेद**

कर्करोग आणि अन्य गंभीर आजारांवरील उपचार आणि संशोधनासाठी पुण्यातील रसायु कॅन्सर क्लिनिक आणि गोव्यातील गोमंतक आयुर्वेद महाविद्यालय आणि संशोधन केंद्र, तसंच कामाक्षी आरोग्यधाम यांच्यादरम्यान नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. या कराराद्वारे आयुर्वेदाच्या माध्यमातून कर्करोगासारख्या दीर्घकालीन आणि गंभीर आजारांवरील उपचार आणि शिक्षण अधिक सक्षमपणे दिलं जाणार आहे. आयुर्वेदाचे विद्यार्थी आणि वैद्यांना प्रत्यक्ष तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेण्याची संधी देखील मिळणार आहे.

**दंड**

दिवाळीमध्ये खासगी बसचालकांद्वारे जास्त तिकिट दर घेतल्याच्या तक्रारी वारंवार येत असतात. त्या पार्श्वभूमीवर पुणे प्रादेशिक परिवहन विभागानं वेगवेगळ्या भागात 42 खासगी बसगाड्यांची तपासणी केली. त्यापैकी 19 बस चालकांनी नियमांचं उल्लघन केल्याबद्दल त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. खासगी बस चालकांनी नियमापेक्षा जास्त तिकीट दर आकारू नये. सर्व नियमांचं पालन करावं, अशा सूचना आरटीओनं दिल्या आहेत.

**कोंडी**

पुणे पोलिसांच्या वाहतूक विभागानं प्रवासासाठी सूचना जाहीर केल्या आहेत. दिवाळीनंतर 24 ते 27 ऑक्टोबर दरम्यान महामार्गांवर वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. पुण्यात येणाऱ्या आणि इतर शहरांना जोडणाऱ्या मार्गांवर वाहतूक कोंडी होऊ शकते. त्यामुळं लोकांनी सार्वजनिक वाहतूक सेवेचा वापर करावा. महामार्गांना पर्यायी असलेल्या मार्गांचा वापर करावा तसंच सकाळी 7 ते 11 आणि संध्याकाळी 5 ते 9 या वेळांच्या व्यतिरिक्त प्रवास करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

**शिक्षक**

पुणे जिल्हयाच्या जुन्नर तालुक्यातील गुळुंचवाडी इथल्या जिल्हा परिषदेतील शिक्षकांचा कृतज्ञता सोहळा काल झाला. या शाळेतील शिक्षक अशोक बांगर, सरिता मटाले आणि नुरजहां पटेल या शिक्षकांची बदली झाल्यानं विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांच्या वतीनं त्यांना सन्मानपत्र देऊन कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या शिक्षकांनी शाळेच्या शिक्षण पद्धतीत आणि पायाभूत सुविधांमध्ये केलेले अमूलाग्र बदल आणि अनेक वर्षांपासून विद्यार्थ्यांशी असलेले ऋणानुबंध याविषयी उपस्थितांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्यानं दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून शाळेची दुमजली इमारत बांधणं, शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना यश मिळण्यासाठी प्रयत्न करणं, संगणक प्रयोगशाळा आणि सौर ऊर्जा प्रकल्प उभा करणं अशी महत्त्वाची कामं या शिक्षकांनी केली.

**घैसास**

पुण्यातील श्री घैसास गुरुजी वेद पाठशाळेच्या वेदभवनाच्या 36 व्या वर्धापन दिन सोहळ्यानिमित्त 26 ऑक्टोबर ते पाच नोव्हेंबर दरम्यान विविध कार्यक्रम होणार आहेत. यामध्ये चतुर्वेदांची पारायणं, ऋग्वेद संहिता स्वाहाकार, विविध देवता याग अशी धार्मिक अनुष्ठानं तसंच संध्याकाळच्या सत्रात कीर्तन, प्रवचन होणार आहेत अशी माहिती वेद भवनाचे प्रधानाचार्य मोरेश्वर घैसास गुरुजी यांनी दिली.

**डीपफेक**

केंद्र सरकारनं माहिती तंत्रज्ञान नियमांमध्ये बदल प्रस्तावित केले आहेत. त्यानुसार कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून तयार केलेल्या सामग्रीचं स्पष्ट लेबलिंग अनिवार्य करण्यात आलं

आहे. डीपफेक आणि चुकीच्या माहितीमुळे होणारं नुकसान रोखण्यासाठी फेसबुक आणि यूट्यूबसारख्या मोठ्या मंचांसाठी वाढीव जबाबदारी देखील या बदलांमध्ये समाविष्ट आहे.

इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं डीपफेक ऑडिओ आणि व्हिडिओ आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर फिरणारी दिशाभूल करणारी सामग्री लक्षणीय नुकसान करू शकते असा इशारा दिला आहे. अशी माहिती प्रतिष्ठेला हानी पोहोचवू शकते, निवडणुकांवर प्रभाव टाकू शकते आणि आर्थिक फसवणूक करू शकते.

माहिती तंत्रज्ञान नियम 2021 मधील प्रस्तावित सुधारणांमुळे चुकीच्या माहितीच्या स्रोताचा शोध घेण्यासाठी आणि जबाबदारी निश्चित करण्याकरिता स्पष्ट कायदेशीर आधार मिळणार आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं या सुधारणांच्या मसुद्यावर संबंधितांकडून अभिप्राय मागितला आहे. पुढील महिन्याच्या 6 तारखेपर्यंत संबंधितांना आपला अभिप्राय IT Rules.consultation@meity.gov.in या ईमेल पत्त्यावर पाठविता येईल.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज आकाश निरभ्र राहून कमाल तापमान 33 अंश सेल्सियस राहिलं. उद्या आकाश ढगाळ राहून पावसाची एखादी सर पडू शकते, कमाल तापमान 32 अंश सेल्सियस राहील असा अंदाज पुणे वेधशाळेनं व्यक्त केला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**